ePaper

## 18 वर्षाखालील मुलांनी गुन्हा केला तर आता थेट वडिलांवर होणार कारवाई



| वर्ष - 7 | अंक - 101 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 12 ऑगस्ट 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत

- 'हर घर तिरंगा' द्वारे राष्ट्रप्रेमाचे दर्शन!
- चांदणी चौकातील उड्डाणपुलाचे आज लोकार्पण!
- ...हे सामर्थ्य नाशवंत नाही!

# प्रस्तावित कचरा डेपोविरोधात

# 'मी पुनावळेकर अभियान'!

**।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पुनावळेतील प्रस्तावित कचरा डेपो विरोधात स्थानिक नागरिकांनी 'मी पुनावळेकर अभियान' सुरू केले असून, महापालिका प्रशासनाने कचरा डेपो पुनावळेकरांवर लादू नये, अशी भूमिका मांडली आहे. या अभियानाने चिंचवड विधानसभा मतदार संघाच्या आमदार अश्विनी जगताप यांनी पाठिंबा दिला असून, आंदोलन आणखी तीव्र करण्यात येणार आहे.



## » आमदार अश्विनी जगताप यांचा पाठिंबा : ग्रामस्थांच्या आंदोलनाची तीव्रता वाढणार?






पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीमध्ये असलेल्या पुनावळे गावातील सर्वे नंबर 23 मधील खासगी जमीन तसेच सर्व्हे नंबर. 24 मधे महाराष्ट्र शासन वन विभागाची 22.80 हेक्टर जमीन आहे. या संपूर्ण जमिनीवर महानगरपालिकेच्या वतीने सन 2005 मधे " घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प " करण्यासाठी आरक्षण टाकण्यात आले आहे. संबंधित विभागाकडून जमीन हस्तांतरण प्रक्रिया सुरू झाली आहे. प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर महानगरपालिकेच्या वतीने त्या ठिकाणी प्रकल्प होऊ शकतो. या प्रकल्पामुळे या परिसरातील विकासाला खोडा बसणार आहे. त्यामुळे हा प्रकल्प रद्द करण्याचा पाठपुरावा करण्याची मागणी पुनावळेतील नागरिकांनी केली आहे. या मागणीचे निवेदन आमदार अश्विनी जगताप यांना देण्यात आले. यावेळी नवनाथ ढवळे, बाळासाहेब दर्शले, राहूल काटे, शुभम भुजबळ व हौसींग सोसायटींचे सदस्य उपस्थित होते.

निवेदनात नमूद करण्यात आले की, पिंपरी- चिंचवड शहर हे भारताच्या नकाशावर स्मार्ट सिटी म्हणून ओळखले जाते. पुनावळे गाव हे याच "स्मार्ट सिटिचा" भाग असून सन 2005 ते 2023 दरम्यान पुनावळे गाव अतिशय वेगाने विकसित झाले आहे. ते एक स्वतंत्र शहरच बनले आहे. येथे जागतिक दर्जाचे "वर्ल्ड ट्रेड सेंटर" या आयटी हबचे काम पूर्ण होत आले आहे. तसेच, या भागात जवळपास 100 ते 150 मोठे गृहप्रकल्प निर्माण झाले आहेत. त्यामध्ये 20 ते 25 हजार सदनिका तयार झाल्या आहेत. देशातील अनेक शहरातील दीड लाख नागरीक या मधे वास्तव्यास आहेत. या परिसरांत राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय दर्जाची शिक्षण संकुले निर्माण झाली आहेत. त्यामधे हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. जवळच पिंपरी चिंचवड शहराला पाणी पुरवठा करणारा "ब्रिटिशकालीन बंधारा पुनावळे येथे आहे. काही अंतरावर राजीव गांधी इंफोटेक पार्क आहे. तसेच संबंधीत जमिनीवर सध्या हजारोंच्या संख्येत मोठमोठे वृक्ष आहेत.

### नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न?

» वरिल सर्व बाबींचा गांभीर्यान् विचार केला असता. संबंधीत जागेवर कचरा डेपो झाल्यास लाखो नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न, स्वच्छ पाणी पुरवठा करण्याचा प्रश्न, शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न, युवकांच्या नोकरीचा प्रश्न, जेष्ठ नागरीकांना शुद्ध हवा मिळण्याचा प्रश्न, वृक्षतोड झाल्याने पर्यावरण दुषीत होण्याचा प्रश्न, वाहतुकीचे प्रश्न निर्माण होऊ शकतात. अशा विविध समस्यांना पुनावळे ग्रामस्थ व परिसरातील हौसींग सोसायटी मधील रहिवाशांना जावे लागेल. त्यामुळे संबधीत " घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प' कायमचा रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली.

### स्वतंत्र कचरा डेपोची आवश्यकता आहे का?

»पिंपरी-चिंचवड महापालिकेने कचरा डेपोसाठी निश्चित केलेली पुनावळेतील 22.8 हेक्टर जागा ताब्यात घेण्याचा हालचाली सुरू केल्या आहेत. त्या जागेच्या बदल्यात राज्य शासनाच्या वन विभागास चंद्रपूर जिल्ह्यातील जागा दिली जाणार आहे. पालिकेने चंद्रपूर जिल्हाधिकाऱ्यांना तसा प्रस्ताव पाठविला असून पालिका जागा खरेदी करून वन विभागास देणार आहे. पिंपरी-चिंचवड शहरात दिवसाला 1100 टन ओला व सुका कचरा जमा होतो. मोशीतील कचरा डेपोत हा कचरा टाकला जातो. तेथील जागा 81 एकर आहे. ओल्या कचऱ्यापासून खत निर्माण केली जाते. सुका कचऱ्यापासून वीज निर्मिती केली जात आहे. 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पाची क्षमता प्रतिदिन १ हजार टन अतकी आहे. तसेच, प्लास्टिक कचऱ्यापासून इंधन निर्मितीही केली जात आहे. यापुढे वेस्ट टू एनर्जी आणि अन्य प्रकल्पांच्या माध्यमातून २०२५ पर्यंत शहर कचरामुक्त करण्याचा दावा प्रशासनाने केला आहे. त्यामुळे पुनावळेत स्वतंत्र प्रकल्प उभारण्याची भविष्यात आवश्यकता भासणार नाही, असा दावा आंदोलनकर्त्यांकडून केला जात आहे.

# 'हर घर तिरंगा' द्वारे राष्ट्रप्रेमाचे दर्शन!

## » शंकर जगताप यांचा पुढाकार : शहरात राष्ट्रध्वज वाटप



**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी। भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवाचा समारोप करीत 76 व्या स्वातंत्र्यदिनाचे स्वागत करण्यासाठी पिंपरी चिंचवड शहर भाजपा सज्ज झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात विविध उपक्रम राबवत राष्ट्रप्रेम जागृत केले जात आहे. यामध्ये शहरातील विविध शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी, वाचनालयासह प्रमूख चौकामधील नागरिकांना तिरंगा ध्वज भेट दिला जात आहे. यासाठी भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी पुढाकार घेतला आहे.**

भारत यंदा स्वातंत्र्याचा 75 वा महोत्सव साजरा करणार असून, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सर्व भारतीयांना हर घर तिरंगा मोहिमेमध्ये सहभागी होण्याचं आवाहन केले आहे. ही मोहीम म्हणजे आजादी का अमृत महोत्सवमधील महत्वाचा भाग आहे. आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत देशभरामध्ये वेगवेगळ्या कार्यक्रमांचं आयोजन सरकारच्या माध्यमातून करण्यात आले आहे. दि. 13 ते 15 ऑगस्टदरम्यान साजरा होणार असला तरी हर घर तिरंगा मोहिमेला दि. 2 ऑगस्टपासून सुरुवात झाली आहे.

हर घर तिरंगा अभियानाद्वारे सरकारची योजना आहे की भारतातील प्रत्येक घरावर राष्ट्रध्वज फडकावा. यासाठी सरकारने 20 कोटी घरांचे लक्ष्य निश्चित केले आहे. यामधून राष्ट्रप्रेमाची भावना जागृत करणे, वाढविणे असा उद्देश आहे. प्रदेश भाजपाच्या सूचनेनुसार, पिंपरी-चिंचवड शहर भाजपातर्फे हे अभियान सर्वसामान्यांपर्यंत पोचविले जात आहे.

लहान वयातच मुलांमध्ये देशभक्ती जागृत करणे गरजेचे आहे. त्यामुळे सज्ञान देशभक्तांची पिढी निर्माण होईल. या उद्देशान शहरातील विविध शाळांमध्ये, महाविद्यालयात जाऊन भाजपाचे पदाधिकारी विद्यार्थ्यांना तिरंगा ध्वज देत आहेत. या बरोबरच शहरातील प्रमूख चौकातील नागरिकांना देखील ध्वज देण्याचा स्तूत्य उपक्रम राबविला जात आहे.

### भाजपाच्या प्रभागनिहाय बैठका...

» हर घर तिरंगा अभियान शहरात सक्षमपणे राबविण्यासाठी शहर भाजपाचे पदाधिकारी प्रभागनिहाय बैठकांचे सत्र आयोजित करत आहेत. त्यामध्ये हे अभियान कसे राबवयाचे, कोणते उपक्रम घ्यायचे या बाबत चर्चा केली जात आहे. शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्ते व ज्येष्ठ यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत.

" स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षाची सांगता आणि 76 व्या स्वातंत्र्यदिनाचे स्वागत या निमित्ताने राबविण्यात येत असलेल्या 'हर घर तिरंगा' या अभियानाप्रसंगी देशप्रेमाचे दर्शन होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात, राज्यात सुरु असलेल्या प्रगतीशील गतिमान वाटचालीमुळे जनतेत उत्स्फूर्त भावना दिसून येत आहे. शहरातील अबालवृद्धांमध्ये या अभियानामुळे राष्ट्रप्रेमाची भावना आणखी वाढली आहे. प्रत्येक नागरिकाने या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन करीत आहोत.

**- शंकर जगताप,**
शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# चांदणी चौकातील उड्डाणपुलाचे आज लोकार्पण!

## » नितीन गडकरी यांची उपस्थिती : पुण्यात होणार महत्त्वपूर्ण बैठक

**। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी। समृद्धी महामार्गासह राज्यातील इतर विविध महामार्ग आणि द्रुतगती मार्गावरील सातत्याने होणारे अपघात रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत केंद्रीय भूपृष्ठ मंत्री नितीन गडकरी शनिवारी पुण्यात बैठक घेणार आहेत. या बैठकीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह संबंधित यंत्रांचे प्रमुख अधिकारी उपस्थित राहणार आहेत.**



पुण्यातील एनडीए (चांदणी) चौकातील नव्या उड्डाणपुलाचे उद्घाटन केंद्रीय भूपृष्ठ मंत्री गडकरी यांच्या हस्ते शनिवारी (१२ ऑगस्ट) करण्यात येणार आहे. यानिमित्त पुणे दौऱ्यात ही महत्त्वपूर्ण बैठकही गडकरी घेणार आहेत.

ही बैठक पाषाण येथे आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीसाठी कराव्या लागणाऱ्या संभाव्य उपाययोजनांचे सादरीकरण करण्याच्या सूचना महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी), सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यात आल्या आहेत.

दरम्यान, नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावर बुलढाणा येथील सिंदखेडराजाजवळ जुलै महिन्यात भीषण अपघात झाला होता. यात तब्बल २५ जणांचा होरपळून मृत्यू झाला. या दुर्घटनेचा न्यायवैद्यक अहवाल समोर आला असून यात अनेक धक्कादायक माहिती समोर आली आहे.

हा अहवाल समोर ठेवूनच शनिवारच्या बैठकीत उपाययोजनांचे सादरीकरण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, अशी माहिती रस्ते महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी गुरुवारी दिली.

### अहवालात काय?

» अहवालानुसार अपघात झाला तेव्हा बस समृद्धी महामार्गाच्या पहिल्या मार्गिकेत होती. ही मार्गिका मागील वाहनांना पुढे जाण्यासाठीची आहे. या मार्गिकेत अपघात झालेल्या बसचा वेग हा जास्त होता. चालकाला डुलकी लागल्याने आधी बसचे समोरचे चाक हे महामार्गाच्या सूचनाफलकाला धडकले. यानंतर बस पलटी होऊन ती दहा फूट अंतरावर असलेल्या दुभाजकाला जाऊन धडकली. या घटनेत बसचा मागील टायर फुटला आणि बसचा एक्सेल तुटून तो वेगळा होऊन डिझेल टाकीवर आदळला. डिझेल टाकीमधील साडेतीनशे लिटर डिझेल सर्वत्र सांडले आणि पसरले. हे तेल इंजिनच्या गरम भागाच्या संपर्कात आल्याने पेटले. परिणामी बसने पेट घेऊन त्यामध्ये २५ प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला.

## मिशन-2024 : नाना काटे समर्थकांचे जोरदार 'ब्रँडिंग'

# ...हे सामर्थ्य नाशवंत नाही!

**।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**चिंचवड विधानसभा मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा (अजित पवार गट) प्रभावी चेहरा आणि महापलिकेतील माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे समर्थकांनी वाढदिवसाचे औचित्य साधून आगामी २०२४ मधील विधानसभा निवडणुकीचा 'शंखनाद' केला आहे. किंबहुना, "पेटेन पुन्हा नव्याने...हे सामर्थ नाशवंत नाही!" या कविवर्य सुरेश भट यांच्या काव्यपंक्तीप्रमाणे चिंचवड काबिज करण्यासाठी पुन्हा नव्याने मशागत सुरू केली आहे.**




### चिंचवडचा भावी आमदार कोण?

**» चिंचवड मतदारसंघात भाजपाच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांना 1,35,603, तर महाविकास आघाडीचे उमेदवार विठ्ठल तथा नाना काटे यांना 99,435 मते मिळाली होती. अपक्ष उमेदवार राहुल कलाटे यांना 44,112 मते मिळाली आहेत. महाविकास आघाडीत बंडखोरी झाली नसती, तर कदाचित चिंचवडमध्ये नाना काटे यांना विजय मिळाला असता. आता राज्यातील आणि शहरातील राजकीय परिस्थिती बदललेली आहे. राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी शिंदे-फडणवीस सरकारमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीची उमेदवारी कुणाला मिळणार? तसेच, भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी असे महायुतीतील पक्ष स्वतंत्रपणे लढल्यास चिंचवडच्या जागेवर राष्ट्रवादी दावा करणार का? चिंचवडचा भावी आमदार म्हणून २०२४ मध्ये पुन्हा अश्विनी जगताप की नाना काटे आणि राहुल कलाटे यापैकी कुणाला चिंचवडकर पसंती देणार? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.**

दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधनानंतर चिंचवडमध्ये पोटनिवडणूक झाली. त्यावेळी अजित पवार महाविकास आघाडीकडून विरोधी पक्षनेतेपदावर कार्यरत होते. ही निवडणूक मार्च- २०२३ मध्ये झाली. त्यावेळी महाविकास आघाडी विरुद्ध भाजपा असा सामना झाला. शिवसेनेचे माजी गटनेते राहुल कलाटे यांनी बंडखोरी केली. त्यामुळे अश्विनी जगताप, नाना काटे आणि राहुल कलाटे अशी तिहेरी लढत झाली. कलाटे यांच्या बंडखोरीमुळे महाविकास आघाडीच्या मतांवर परिणाम झाला. भाजपाचा फायदा झाला. त्यामुळे काटे यांना पराभव पत्कारावा लागला होता. ही सल काटे समर्थकांमध्ये आहे. त्याचे वचपा आगामी विधानसभा निवडणुकीत काढण्याचा निर्धार नाना काटेंच्या समर्थकांनी केलेला पहायला मिळत आहे.

भारतीय स्वातंत्र्यदिनी म्हणजेच १५ ऑगस्ट रोजी नाना काटे यांचा वाढदिवस आहे. स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छांसह नाना काटेंना वाढ दिवसाच्या शुभेच्छांचे फलक संपूर्ण मतदार संघातील मुख्य चौकांत लावण्यात आले आहेत. तसेच, विविध सामाजिक उपक्रमांचेही आयोजन केले आहे. विधानसभा निवडणूक ऑक्टोबर २०२४ मध्ये प्रस्तावित असून, त्या अनुशंगाने काटे समर्थक आणि यंत्रणा कामाला लागली आहे. आगामी वर्षभरात मतदार संघातील घराघरामध्ये जावून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आणि नाना काटे यांच्या "पिंपळे सौदागर मॉडेल" ची जागृत करण्यात येणार आहे. त्याद्वारे केवळ विकासकामांच्या मुद्यांवर चिंचवडकरांना मतदानासाठी आवाहन करण्यात येईल, असा दावा केला जात आहे.

महाआरोग्य शिबीर अन् सामाजिक उपक्रम...
नाना काटे यांचा 15 ऑगस्ट रोजी वाढदिवस साजरा होत आहे. यानिमित्त चिंचवड विधानसभा मतदार संघातील नागरिकांसाठी महाआरोग्य शिबिर व रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे . यामध्ये मोतीबिंदू शस्त्रक्रिया, दातांचे उपचार, हृदयरोग तपासणी, कॅन्सर शस्त्रक्रिया उपचार व तपासणी, जनरल शस्त्रक्रिया, मणक्याचे विकार शस्त्रक्रिया याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. हे शिबिर 13 ऑगस्ट रोजी नवी सांगवी येथील संस्कृती लॉन्स मंगल कार्यालय, वाल्हेकरवाडी येथील शुभम गार्डन मंगल कार्यालय, रहाटणी येथील विमल गार्डन मंगल कार्यालय तसेच तापकीर नगर काळेवाडी येथे चंद्रकांत तापकीर यांनी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. महादेव मंदिर येथे बॉडी प्लस थेरपी, वृक्षमित्र श्री अरुण पवार यांच्या वतीने पिंपळे गुरव येथे ११००० वृक्ष रोपांचे वाटप करण्यात येणार आहे.पिंपळे सौदागर लिनियर गार्डन येथे वृक्षारोपण करण्यात येणार आहे.दि.१३ ऑगस्ट रोजी कापसे लान्स येथे उमेश काटे यांच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी आर.जे. अक्षय प्रस्तुत रजनी गंधा मराठी व हिंदी गाण्यांची महफील आयोजित केले आहे.

---

## महाविद्यालयांमध्ये 'विद्यार्थी सहाय्यता कक्ष' सुरू करा! : दीपक मोढवे-पाटील

### » राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मागणी




**।पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**राज्यातील महाविद्यालयात विद्यार्थी सहाय्यता केंद्र सुरू करण्याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा. तसेच, 'रॅगिंग' सारख्या प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर कार्यवाही करावी, अशी मागणी भाजपाचे माजी शहर उपाध्यक्ष दीपक मोढवे-पाटील यांनी केली आहे.**

**।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

याबाबत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन पाठवले असून, त्यामध्ये म्हटले आहे की, ठाण्यातील बांदोडकर आणि जोशी बेडेकर महाविद्यालयात एनसीसीच्या विद्यार्थ्यांना अमानुष मारहाण केल्याची घटना उघडकीस आली आहे. त्यामध्ये एक सिनियर विद्यार्थी इतर ज्युनियर विद्यार्थ्यांना अमानुषपणे मारहाण करत आहे. याबाबतचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. हा व्हिडीओ समोर आल्यानंतर विद्यार्थी आणि पालकांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. यासह राज्यातील अनेक महाविद्यालयांमध्ये रॅगिंग सारखे प्रकार आजही घडत असल्याची शंका निर्माण होते. त्यामुळे नवीन विद्यार्थी सीनियर विद्यार्थ्यांकडून होणाऱ्या रॅगिंगच्या भीतीपोटी प्रवेश घ्यायला तयार होत नाहीत. यामध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. पुणेसह पिंपरी-चिंचवड शहरात देखील महाविद्यालयाबाहेर बसून काह जण टवाळखोरी करत आहेत. त्यामुळे पोलीस प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला पाहिजे. मात्र, ही एक दिवसाची जुजबी कारवाई करून याला आळा बसणार नाही. त्यासाठी कायमस्वरूपी तोडगा निघणे गरजेचे आहे. त्यासाठी महाविद्यालय स्तरावर ही कार्यवाही होणे अपेक्षित आहे. शहरात पोलीस प्रशासनाकडून भरारी पथकांची निर्मिती केलेली आहे. या पथकांमार्फत होणाऱ्या कारवाईला वेग देणे आवश्यक आहे. तरच हुल्लडबाजांवर आळा बसेल, अशी नागरिकांची भावना आहे, असेही दीपक मोढवे-पाटील म्हटले आहे.

> “ विद्यार्थ्यांना चांगल्या महाविद्यालयात उच्च शिक्षण घ्यायचे असल्यास मारहाण, रॅगिंगसारखे प्रकार घडू नयेत, यासाठी खबरदारी घेणे गरजेचे आहे. त्यासाठी राज्यातील प्रत्येक महाविद्यालयात शासनाचे नियंत्रण असणारे विद्यार्थी सहाय्यता केंद्र सुरू करावे. जेणेकरून विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणीचे गाऱ्हाणे तिथे मांडले जाईल आणि त्यातून विद्यार्थ्यांची मदत होईल. या बाबत लवकर निर्णय घेऊन कार्यवाही करावी, अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना केली आहे. यावर सकारात्मक निर्णय होईल, असे अपेक्षीत आहे.
>
> – दीपक मोढवे-पाटील,
> माजी शहर उपाध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड



## भूमिका

# गडबड आहे, पण पुरावे नाहीत!

**अशोका विद्यापीठात शिकवणाऱ्या डॉ. सब्यसाची दास या अर्थशास्त्रांच्या 'डेमोक्रॅटिक बॅकस्लायडिंग इन द वर्ल्ड्स् लार्जेस्ट डेमोक्रसी', या अद्याप प्रकाशित न झालेल्या शोधनिबंधाने अपेक्षेप्रमाणे लक्ष वेधून घेतले आहे. या प्रकारच्या अभ्यासाच्या शिस्तीशी मी परिचित आहे.**

त्यामुळे मी तुम्हाला अधिकारवाणीने सांगू शकतो की गेल्या काही वर्षांमध्ये भारतीय निवडणुकांसंदर्भात जे काही अभ्यास झाले आहेत, त्यातील हा अत्यंत उत्तम शोधनिबंध आहे. आपल्याकडील संसदीय निवडणुकीतील महत्त्वाच्या गैरव्यवहारांची आकडेवारी देणारा हा पहिलाच शोधनिबंध आहे. निष्कर्ष काढताना लेखक म्हणतो, "मला मतदार नोंदणीच्या टप्प्यावर तसेच मतदानावेळी आणि मतमोजणीच्या वेळी निवडणुकीतील फेरफाराशी सुसंगत पुरावे आढळले. मतदानाच्या आणि मतमोजणीच्या अशा दोन्ही वेळी, मुस्लिमांबाबत ठरवून भेदभाव केल्याचे आढळले. निवडणूक निरीक्षकांनी नीट देखरेख न ठेवल्यामुळे हे घडू शकते." याबरोबरच एक आवश्यक मुद्दा लेखक जोडतो की "अभ्यासासाठी केलेल्या या चाचण्या म्हणजे फसवणुकीचे पुरावे नाहीत, किंवा त्या असेही सुचवत नाहीत की हा फेरफार व्यापक प्रमाणावर होता." हा शोधनिबंध ईव्हीएम



हॅकिंगसारख्या महत्त्वाच्या मुद्द्याकडून लक्ष भरकटवू पाहणाऱ्या वादग्रस्त मुद्द्यांवर काळजीपूर्वक बाजू मांडतो.

आपल्याकडे काही गृहीतके आहेत. एक म्हणजे ईव्हीएमसारख्या इलेक्ट्रॉनिक उपकरणात फेरफार करता येऊ शकतो. असा फेरफार सत्ताधारी प्रशासन बिनदिक्कत करू शकते आणि अशा फसवणुकीला तोंड देण्यासाठी निवडणूक आयोगावर विश्वास ठेवता येणार नाही. ईव्हीएममध्ये फेरफार केला जाऊ शकतो हे सूचित करण्यासाठी ही गृहीतके पुरेशी आहेत, परंतु ईव्हीएमचा वापर निवडणूक निकालांमध्ये फेरफार करण्यासाठी केला गेला आहे, हे त्यातून सिद्ध करता येत नाही. सुदैवाने, सब्यसाची दास या काहीशा निष्फळ वादात अडकत नाहीत. तसेच निवडणुकीच्या स्थानिक पातळीवरील फेरफाराचे पुरावे एकत्र करण्याचेही प्रयत्न करत नाहीत. त्याऐवजी, दास मतदारसंघ आणि बूथ स्तरावरील निकालांच्या नमुन्यांचे विश्लेषण करतात. हे नमुने अधिकृत निवडणूक माहितीवर आधारित आहेत. बूथ स्तरावर त्यांचे विश्लेषण केले जाऊ शकते आणि राष्ट्रीय स्तरावर ते एकत्र केले जाऊ शकतात. ते गैरव्यवहाराचे उदाहरण समोर ठेवायला आणि तो कसा झाला हे ओळखायला मदत करू शकतात, पण तो कसा झाला याचा सबळ पुरावा देऊ शकत नाही, ही त्यांची मर्यादा आहे. कोणत्याही निष्कर्षांवर जाण्यापूर्वी, आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की हा शोधनिबंध संभाव्यतेबद्दल आहे. तो काहीतरी गडबड आहे, हे सांगू शकतो; ती गडबड काय आहे ते सांगू शकत नाही. फसवणूक कशी केली याचा कोणताही पुरावा यात मिळत नाही. तसेच तो २०१९ च्या निवडणुकीच्या संपूर्ण निकालावर शंका घेत नाही. या फेरफाराच्या शक्यतेतून भाजपने ९ ते १८ संसदीय जागा मिळवल्या असाव्यात असा लेखकाचा अंदाज आहे, पण ही संख्या भाजपच्या लोकसभेतील बहुमतावर मोठा परिणाम करणारी नाही. म्हणून, हा शोधनिबंध नरेंद्र मोदी २०१९ च्या निवडणुकीत फसवणूक करून सत्तेवर आले असे म्हणत वा सूचित करत नाही.

हा शोधनिबंध अशी शक्यता दाखवतो की भाजपने त्यांचे वर्चस्व असलेल्या राज्यांमध्ये लक्ष्य केलेली नावे हटवणे (विशेषत: मुस्लीम), मतदारांना मतदान केंद्रावरून मागे वळवणे आणि काही निवडक मतदारसंघांत मतमोजणी चुकवणे यासाठी आपल्या ताकदीचा वापर केला. माझ्या मते या निष्कर्षांचे परिणाम दूरगामी आहेत. मतदार यादीतील संभाव्य फेरफार मोठ्या प्रमाणात भाजपशासित राज्यांमधील तसेच काही किरकोळ मतदारसंघातील भाजपविरोधी मतदारांना हटवण्यापुरते मर्यादित असू शकत नाही. भाजपच्या निवडणूक यंत्रणेमुळे आणि कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या अंदाजित मिलीभगतीमुळे ते बिगर-भाजप राज्यांसह बहुतेक जागांपर्यंत वाढू शकते. माझ्या मते, हे मुस्लीम मतदारांना हटवण्यापुरते मर्यादित असू शकत नाही. त्यात भाजपला मते देण्याची शक्यता नसलेल्या इतर सामाजिक गटांचा समावेश असू शकतो. बोगस नावांचा त्यात समावेश असू शकतो. पण हे सगळे या शोधनिबंधामध्ये येत नाही.

## संपादकीय »

### कळ सोसणे बरे!

***या अविश्वास ठराव चर्चेत अनपेक्षित असे काहीही नव्हते. यांनी त्यांची वस्त्रे फेडायची आणि त्यांनी यांच्या कासोट्यास हात घालायचा, इतकाच काय तो उद्योग..***


इतिहासातील काँग्रेसच्या कथित दुष्कृत्यांचा कोळसा उगाळून मणिपुरातील भयानक वर्तमानात होरपळणाऱ्या महिलांच्या जखमांवर कशी फुंकर घातली जाणार हा प्रश्नच आहे.. प्रतिप्रश्नांचे संकट नसलेल्या अत्यंत सुरक्षित वातावरणात आणि प्रत्येक शब्दमौक्तिक टिपून ते मस्तकी धारण करण्यास आणि विचार कानात प्राण आणून ऐकण्यास सज्ज असलेल्या अनुयायांसमोर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे वक्तृत्व नेहमीच फुलून येते.

तसेच ते आले आणि त्यांच्या सरकारवरील अविश्वास ठरावाच्या त्यांनी ठिकऱ्या उडवल्या. त्या उडवताना पंतप्रधान म्हणाले, हा कालखंड भारताचा आहे. ते मान्य. पंतप्रधान म्हणाले: येथे बसलेल्या प्रत्येक सदस्याने विकासाची कास धरायला हवी. तेही मान्यच. पंतप्रधानांनी सांगितले: भारतात विक्रमी विकास जोमाने होत आहे.

**रिझर्व्ह बँकेच्या पतधोरणामध्ये गुरुवारी व्याजदर सातत्याची अपेक्षित घोषणा झाली. व्याजदर, विकासदरापेक्षाही चलनवाढीचा दर सध्या कळीचा ठरू लागल्यामुळे, विकासाची कास सोडून महागाई नियंत्रणाला प्राधान्य देणे रिझर्व्ह बँकेला भाग पडत आहे.**

# स्थानकातच थबकले 'इंजिन'!

कोणत्याही मध्यवर्ती बँकेसाठी ही तारेवरची कसरत असतेच. पण या वाटचालीमध्ये मध्यवर्ती बँक आणि मध्यवर्ती सरकार यांच्यात निव्वळ सुसंवाद असणे पुरेसे नसते. या दोहोंचा अधिकार समसमान असणे व या वाटपाचे भान असणेही गरजेचे असते. नपेक्षा, महागाईचा सुधारित वाढीव अंदाज व्यक्त करताना, त्याच सुरात '६.५ दराने विस्तारणारी भारतीय अर्थव्यवस्था जागतिक विकासाचे इंजिन ठरेल' असे एरवी सरकारातील व्यक्ती आणि समर्थकांनाच शोभून दिसणारे टाळीबाज वाक्य गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी त्यांच्या अहवालात उद्धृत केले नसते. 'जागतिक अर्थझाकोळातील तेजोबिंदू' असे भारतीय अर्थव्यवस्थेचे वर्णन हल्ली कोणत्याही टिपणाच्या वा भाषणाच्या प्रस्तावनेपासून अन्तापर्यंत करणे हे विद्यमान सरकारातील प्रभारींसाठी अनिवार्य बनले आहे. रिझर्व्ह बँकेचे विद्यमान गव्हर्नर या मंडळींपेक्षा



वेगळे ठरतात, याविषयीचे कोणतेही पुरावे आढळत नाहीत. त्यामुळेच मध्यवर्ती बँकेच्या धोरणांवर मध्यवर्ती सरकारच्या स्वप्नांचीच सावली पडलेली आढळते. व्याजदर स्थिर ठेवून एकीकडे कर्जदारांना दिलासा देण्यात आला असला, तरी महागाई नियंत्रणाची लढाई आटोक्यात येताना दिसत नाही अशी परिस्थिती आहे. द्वैमासिक पतधोरण बैठकीच्या निमित्ताने सलग तिसऱ्यांदा सर्व व्याजदरांचा मूलाधार असलेला रेपो दर ६.५ टक्के कायम राखण्यात आला आहे. तो वाढवून कर्जे महाग केली, तर अर्थव्यवस्था आक्रसणार. हा दर घटवून व्यवस्थेत तरलता आणली तर चलनवाढ भडकणार. या तिढ्यात 'जैसे थे'चा पर्याय रिझर्व्ह बँकेने निवडला. याशिवाय महागाई दरासंबंधीचे वार्षिक भाकीत ५.१ टक्क्यावरून ५.४ असे करण्यात आले आहे. सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या (जीडीपी) वाढीचे अनुमान ६.५ टक्के कायम ठेवण्यात आले आहे. म्हणजे विकासदर कायम राहिला, तरी महागाईत वृद्धी होणार असे रिझर्व्ह बँकेचे म्हणणे. महागाई दर चार टक्क्यांच्या खाली आणण्याचे उद्दिष्ट रिझर्व्ह बँकेला काही काळ साधलेले नाही हे वास्तव दुर्लक्षिण्यासारखे नाही. किरकोळ महागाई निर्देशांक विशेषत: भाज्यांच्या भडकलेल्या दरांमुळे ६.२ टक्क्यांवर जाईल, असे रिझर्व्ह बँकेला वाटते. यंदा 'एल निनो'मुळे देशभरात अनेक ठिकाणी पावसाचे वितरण असमान झाले. याचा फटका विशेषत: टोमॅटो, मिरची आणि कांद्याला बसला. हा झाला स्थानिक मुद्दा. पण सौदी अरेबिया या बड्या तेल उत्पादक व निर्यातदार देशाने उत्पादनकपात सप्टेंबर महिन्यातही जारी राहील, असे जाहीर केले आहे.

## ।। अभंगवाणी ।।



बहुतांच्या आम्ही न मिळो मतासी ।
कोणी कैसी कैसी भावनेच्या ॥१॥

विचार करितां वांयां जाय काळ ।
लटिकें तें मूळ फजितीचें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राष्ट्रवादीचा भाजपविरोध, थोडा घोळच!

## विरोधात कोण, सत्तेत कोण : हेच शरद पवार यांचे राजकारण

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्याचे पावसाळी अधिवेशन झाले तरी शरद पवार गटाकडे किती आमदार आहेत आणि अजित पवार गटाकडे किती आमदार आहेत, हे कळलेच नाही. राष्ट्रवादीतून विरोधात कोण, सत्तेत कोण? हेच समजले नाही. हेच शरद पवार यांचे राजकारण आहे, असा टोला मनसे आमदार राजू पाटील यांनी लगावला.**

एका वृत्तवाहिनीशी बोलताना राजू पाटील यांनी सध्याच्या राजकारणावर चौफेर टोलेबाजी केली. राजू पाटील म्हणाले, प्रत्येक पक्षाची विचारधारा आहे. त्यानुसार त्या पक्षाचे राजकारण चालते. पण राष्ट्रवादी काँग्रेसचे चित्र वेगळेच आहे. अजितदादा कोणत्याही स्टेजवर जातात. अर्थात ते सत्तेत आहेत. अजितदादा भाजपसोबत आहेत. सुप्रिया सुळे भाजपविरोधात भांडतात हा थोडा घोळच आहे. राज्याचे अधिवेशन झाले तरी राष्ट्रवादीचे कोणते नेते सत्तेत आणि कोण विरोधात हे समजले नाही. संसदेत राहुल गांधी यांनी मणिपूर हिंसाचारावरून पंतप्रधान मोदींवर घणाघाती टीका केली. मात्र, त्यानंतर उभ्या राहिलेल्या



स्मृती इराणी यांनी राहुल गांधींवर गंभीर आरोप केला. राहुल गांधी यांनी आपल्याकडे पाहून फ्लाईंग किस दिली, असा आरोप स्मृती इराणी यांनी केला. या मुद्द्यावरही राजू पाटील यांनी भूमिका मांडली. राजू पाटील यांनी राहुल गांधींचे समर्थन केले. राजू पाटील म्हणाले, राहुल गांधी याचे भाषण मी पाहत होतो. भाषण संपल्यावर राहुल यांनी हातवारे केले. मला वाटत नाही तो फ्लाईंग किस होता. मणिपूरमधील महिलांच्या अत्याचाराचा विषय सुरू होता. या विषयापासून लक्ष इतरत्र वळवण्यासाठी भाजपच्या महिला खासदारांनी केलेला हा गलिच्छ आरोप होता, असे मला वाटत असल्याचे राजू पाटील म्हणाले. दरम्यान, गेल्या काही दिवसापासून उद्धव ठाकरे हे राज ठाकरे यांच्याशी फोनवर संपर्क साधणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू होती. राजू पाटील म्हणाले, राज ठाकरे यांच्याकडे बाळासाहेब ठाकरे यांच्या पूर्वीच्या भाषणाच्या काही क्लिप्स आहेत. राज यांचे वडील श्रीकांत ठाकरे यांनी त्या संग्रहित करून ठेवल्या आहेत. एक मात्र नक्की की बाळासाहेबांचे स्मारक खरोखरच चांगले करायचे असेल तर राज यांच्या व्हिजनने आणि विचारांनी व्हायला पाहिजे.

### पत्रकाराच्या मारहाणीचा निषेध

» पाचोरा येथे पत्रकाराला झालेल्या मारहाणीचाही राजू पाटील यांनी निषेध केला. राजू पाटील म्हणाले, पूर्वीचे सरकार आणि आताचे सरकार पोलिस यंत्रणांचा गैरवापर करत आहे. पक्षावर टीका केली तर कार्यकर्त्यांना मारहाण केली जात आहे. सोशल मीडियावर एखाद दुसरा कार्यकर्ता बोलत असेल तर मारहाण केली जात आहे. आता पत्रकारांवरही हीच वेळ आली आहे. ही गंभीर बाब आहे. पत्रकारांनी सुद्धा या गोष्टींचा निषेध नोंदवला पाहिजे. कोणताही पक्ष असो, अशा गोष्टी खपवून घेता कामा नये.

---

# राहुल गांधींची दहशत!

## विजय वडेट्टीवारांचा भाजपवर हल्लाबोल

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**संसदेत राहुल गांधींनी उपस्थित केलेल्या एकाही प्रश्नाचे उत्तर पंतप्रधान मोदींना देता आले नाही. राहुल गांधींना पूर्ण भाजप घाबरला आहे. भाजपने राहुल गांधींची दहशत घेतली आहे, असे म्हणत राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी भाजपवर जोरदार हल्ला चढवला.**

विजय वडेट्टीवार म्हणाले, संसदेत मणिपूर हिंसाचारावर चर्चा होती. त्यावर काहीही न बोलता मोदी थेट यासाठी पंडित जवाहरलाल नेहरूंना जबाबदार धरत होते. स्वतःच्या जबाबदारीपासून दूर पळणारे आणि आपल्या नाकर्तेपणातून आलेले अपयश झाकण्यासाठी इतरांवर आरोप करणारे पंतप्रधान आता देशाला नको. मोदींच्या भाषणातील 75 टक्के भाग केवळ काँग्रेसवर होता. विजय वडेट्टीवार यांनी राज्यातील



### भाजप पूर्ण घाबरला आहे

» विजय वडेट्टीवार म्हणाले, भाजपला काँग्रेसची भीती वाटत आहे. राहुल गांधींना तर पूर्ण भाजप घाबरला आहे. राहुल गांधींची दहशत भाजपने घेतली आहे. त्यामुळेच त्यांच्या भाषणातील महत्त्वाचे मुद्दे संसदीय कामकाजातून वगळण्यात आले. राहुल गांधींवर खालच्या स्तराचे आरोप आले. मुळ मुद्द्यापासून लक्ष विचलीत करण्याचा प्रयत्न झाला.

महायुतीवरही घणाघाती टीका केली. विजय वडेट्टीवार म्हणाले, अजित पवारांनी वॉररूममध्ये बैठक घेतली. तो अधिकार खरे तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा. आता अजित पवारांच्या बैठकीमुळे मुख्यमंत्र्याच्या वॉर रूमवरून कोल्ड वॉर सुरू झाले आहे. कारण अधिकार नसताना उपमुख्यमंत्री अजित पवार वॉररूममध्ये बैठक घेतली. मुख्यमंत्र्यांना तो अधिकार आहे. विजय वडेट्टीवार म्हणाले, महायुतीत तीन दिशेला तीन तोंडं आहेत. केवळ सत्तेसाठी एकमेकांकडे बघतात मलिदा खायचे असेल तर मिळून खातात पण जनतेच्याा, महाराष्ट्राच्या प्रश्नासाठी यांना वेळ नाही. राज्यात जे सुरू आहे ते सगळे हास्यस्पद आहे. पालकमंत्र्याचा पत्ता नाही, मंत्रिमंडळ विस्तार व पालकमंत्री नियुक्ती रखडल्या आहेत. 28 मंत्री कार्यरत आहेत. 28 मंत्री 28 जिल्ह्यात पालकमंत्री म्हणून जाऊ शकले असते आणि जनतेला न्याय देऊ शकले असते. परंतु तिथे पालकमंत्री नसल्याने जिल्हाधिकाऱ्यांना ध्वजारोहण करावे लागत आहे, हे दुर्दैवी आहे. तुम्ही काँग्रेस आणि नेहरूंबद्दल ढोल कशाला पिटता? सध्या देशात तुमचे सरकार आहे. तुम्ही सांगता त्या प्रमाणे नेहरुंची चुकीची झाली असेल. मग त्या चुका तुम्ही सुधारा ना. नेहरूंमुळे मणिपूरची समस्या आहे, तर तुम्हाला दहा वर्ष दिले तुम्ही मणिपूरसाठी काय केले? असा सवाल ठाकरे गटाचे संजय राऊत यांनी उपस्थित केला.

# उपचार न मिळाल्याने पाच रुग्णांचा मृत्यू

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे जिल्ह्यातील महानगरपालीकेच्या कळवा मधील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात गंभीर घटना घडली आहे. येथे उपचार न मिळाल्याने पाच रुग्णांचा मृत्यू झाल्याचा आरोप रुग्णांच्या नातेवाईकांनी केला आहे. रुग्णालयात रुग्णांना तपसण्यासाठी डॉक्टरच येत नसून रुग्णांना वेळेवर औषधी दिली नसल्याचे त्यांचा मृत्यू झाल्याचा आरोप केला जातोय. या संदर्भातील माहिती मिळताच आमदार जितेंद्र आव्हाड आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी घटनास्थळी पोहोचले. त्यांनी रुग्णालय प्रशासनावर अनेक गंभीर आरोप केले आहे.

या प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याची मागणी आता करण्यात आली आहे. ठाण्यातील शिवाजी रुग्णालया बाबतच्या तक्रारी कानावर येतच होत्या. आज एका महिलेचा फोन आला की, तिच्या पतीवर उपचार सुरू आहेत, परंतु रुग्णालय प्रशासन त्यांची व्यवस्थित काळजी घेत नाहीये.



काय प्रकार आहे हे जाणून घ्यावा म्हणून रुग्णालयात गेलो असता, रुग्णालयात सुरू असणारे प्रकार पाहून मी सुन्न झालो, तळपायाची आग मस्तकात गेली. मेलेल्या रुग्णावर उपचार सुरू असल्याचे दाखवून त्या रुग्णाच्या पार्थिवाला ICU मध्ये नेण्यात येते. रुग्णालयात गरिबांची फसवणूक आणि लूट सुरू असल्याचा आरोप आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. रुग्णालय प्रशासनाने सर्व आरोप फेटाळले आहेत. मृत रुग्ण दाखल झाले तेव्हाच अत्यवस्थ असल्याचा दावा प्रशासनाने केला आहे. यात पहिला रुग्ण दारूच्या आहारी गेलेले होता. त्याने श्वासनलिकेत उलटी केली. दुसरा पेशंट हा हृदविकार येऊन तिसऱ्या स्टेजला आला. दोन-तीन दिवस खासगी रुग्णालयात उपचार घेऊन ते पुन्हा इकडे येतात. तीनही पेंशंट आधीच अत्यावस्थ होते, असेही रुग्णालय प्रशासन म्हटले होते.

# काँग्रेसवरच जनतेचा अविश्वास

## » पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा लोकसभेत घणाघात

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**काँग्रेस पक्ष आपल्या अहंकाराने एवढा आंधळा झाला आहे, की त्यांना सत्य दिसत नाही. देशाच्या जनतेमध्येच त्यांच्याबाबत प्रचंड अविश्वास आहे, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरूवारी विरोधकांवर टीका केली. यावेळी त्यांनी मणिपूरमध्ये शांतता प्रस्थापित व्हावी, यासाठी केंद्र व राज्य सरकार प्रयत्न करीत असून त्याला लवकरच यश येईल, अशी ग्वाहीदेखील दिली. भाषण सुरू असतानाच विरोधकांनी सभात्याग केल्यामुळे अविश्वास प्रस्ताव आवाजी मतदानाने फेटाळण्यात आला.**

काँग्रेसचे उपनेते गौरव गोगोई यांनी मांडलेल्या अविश्वास प्रस्तावावर मंगळवारी लोकसभेत चर्चा सुरू झाली होती. तीन दिवस सत्ताधारी तसेच विरोधी पक्षांच्या सदस्यांनी या ठरावाच्या समर्थनार्थ किंवा विरोधात आपल्या भूमिका मांडल्या. त्यानंतर गुरुवारी संध्याकाळी सव्वापाचच्या सुमारास पंतप्रधान मोदी या चर्चेला उत्तर देण्यासाठी उभे राहिले. जगभरातील एखाद्या सर्वेक्षणामधून देशविरोधी अपप्रचार होत असेल, तर तो अधिक फुलविण्यामध्ये काँग्रेसला अभिमान वाटतो. त्यामुळेच तमिळनाडू, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, गुजरात, बिहार, त्रिपुरा, ओडिशा या राज्यांमधील जनतेने काँग्रेसवर आपला अविश्वास जाहीर केला आहे. पंतप्रधानांनी आपल्या भाषणामध्ये 'इंडिया' आघाडीच्या नावावरही जोरदार तोंडसुख घेतले. जुन्याच गाडीला नवा रंग फासून ती 'इलेक्ट्रिक वाहन' असल्याचे सांगून तुम्ही रस्त्यावर आणली आहे, असा टोमणा त्यांनी लगावला. ही 'इंडिया' आघाडी नसून 'घमंडिया' आघाडी आहे, या मोदींच्या वक्तव्यावरून विरोधकांचा संताप झाला आणि त्यांनी सभात्याग केला. सदर अविश्वास प्रस्ताव हा मुख्यत: मणिपूरमधील हिंसाचाराच्या मुद्द्यावर आला असतानाही पहिल्या दीड तासात पंतप्रधानांनी मणिपूरमधील हिंसाचारावर भाष्य केले नव्हते. विरोधकांच्या सभात्यागानंतर त्यांच्या भाषणामध्ये मणिपूरचा मुद्दा सर्वप्रथम आला. मणिपूरमधील हिंसाचार आटोक्यात आणून तेथे शांतता प्रस्थापित करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारकडून एकत्रितरित्या प्रयत्न केले जात आहेत, अशी ग्वाही पंतप्रधानांनी दिली. महिलांबाबत अत्यंत गंभीर अपराध करणाऱ्यांना माफ केले जाणार नाही, त्यांना कठोरात कठोर शिक्षा होईल, असेही ते म्हणाले. 'मणिपूरमध्ये भारतमातेला इजा' केल्याच्या राहुल गांधी यांच्या विधानामुळे देशवासियांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. काही जण भारतमातेच्या मृत्यूची इच्छा का करीत आहेत, असा सवाल मोदी यांनी केला. "हे लोक (काँग्रेस) लोकशाहीची हत्या, राज्यघटनेची हत्या अशी ओरड करतात. पण भारतमातेला गुलामगिरीतून मुक्त करण्याची वेळ आली, तेव्हा यांनीच तिचे तीन तुकडे केले," असा घणाघात मोदी यांनी केला. मणिपूरमधील घटना वेदनादायी आहेत. महिलांवर अत्याचार अस्विकारार्ह असून गुन्हेगारांना शिक्षा करण्यासाठी केंद्र व राज्य सरकार काम करीत आहे, असे ते म्हणाले. याबरोबरच इशान्येकडील राज्यांमध्ये आपल्या सरकारने राबविलेल्या विकासकामांची यादीदेखील पंतप्रधानांनी यावेळी वाचून दाखविली. आपण आतापर्यंत ५०पेक्षा जास्त वेळा इशान्येकडील राज्यांना भेटी दिल्या असून आपल्या मंत्र्यांनी ४०० पेक्षा जास्त वेळा दौरे केल्याचा दावाही त्यांनी केला.



> “ हा अविश्वास प्रस्ताव आपल्यासाठी 'शुभशकून' असल्याचा टोमणा मोदी यांनी लगावला. २०१८मध्ये विरोधकांनी अविश्वास प्रस्ताव आणल्यानंतर पुढील वर्षी पुन्हा सत्ता मिळाली. आताही यापूर्वीचे सर्व विक्रम मोडून भाजप आणि मित्रपक्ष पुन्हा सत्तेत येतील, असा विश्वास मोदी यांनी व्यक्त केला. विकासासाठी आवश्यक असलेली अनेक विधेयकांवरील चर्चा संसदेमध्ये रोखून धरल्याबद्दल त्यांनी विरोधकांवर टीकास्त्र सोडले. मणिपूरमधील घटना वेदनादायी आहेत. महिलांवर अत्याचार अस्विकारार्ह असून यातील गुन्हेगारांना निश्चित कठोर शिक्षा केली जाईल. मणिपूरमध्ये शांतता प्रस्थापित व्हावी यासाठी केंद्र व राज्य सरकार एकत्रिपणे काम करीत असून त्याला लवकरच यश येईल.
>
> **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

### विरोधकांचा पाकिस्तानवर अधिक विश्वास

» देशात जेव्हा एखादा अतिरेकी हल्ला होतो, तेव्हा काँग्रेस आणि त्याचे मित्रपक्ष आपल्या देशाची अंगभूत ताकद आणि आपल्या सैनिकांपेक्षा पाकिस्तानवर जास्त विश्वास ठेवतात. त्यामुळे ते काश्मीरमधील फुटिरतावाद्यांशी चर्चा करायला जातात, असा आरोप मोदी यांनी आपल्या भाषणात केला. "पाकिस्तानातून आपल्या सीमांवर हल्ले होतात. पाकिस्तानातून अतिरेकी घुसवून अतिरेकी पाठविले जातात. मात्र पाकिस्तान कधीही त्याची जबाबदारी स्वीकारत नाही. पाकिस्तानने हात झटकले की यांचा (काँग्रेसचा) त्यावर लगेच विश्वास बसतो. काश्मीर दहशतवादाच्या आगीत होरपळत आहे, या सर्वसामान्यांच्या सांगण्यावर त्यांचा विश्वास नव्हता. त्याऐवजी हुर्रियत, विघटनवादी आणि पाकिस्तानचे झेंडे घेऊन फिरणाऱ्यांवर त्यांचा भरोसा होता," असे मोदी म्हणाले.

---

# अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणाऱ्याला फाशी

## » IPC आणि CRPC मध्ये बदल करण्यासाठी नवे विधेयक

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**केंद्र सरकार ब्रिटिशकालीन काही कायद्यांमध्ये सुधारणा करणार आहे. यासाठी सरकार क्रिमिनल प्रोसिजर कोड अमेंडमेंट बिल 2023 आणणार आहे. लोकसभेत ही माहिती देताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले की, मी आज एकत्र आणलेली तीन विधेयके पंतप्रधान मोदींच्या पाच प्रतिज्ञांपैकी एक पूर्ण करणार आहेत.**

या तीन विधेयकांमध्ये एक भारतीय दंड संहिता, एक फौजदारी प्रक्रिया संहिता आणि तिसरी भारतीय पुरावा संहिता आहे. भारतीय दंड संहिता 1860 ची जागा आता 'भारतीय न्याय संहिता 2023' ने घेतली जाईल. फौजदारी प्रक्रिया संहिता 'भारतीय नागरी संरक्षण संहिता, 2023' ने बदलली जाईल. आणि भारतीय पुरावा कायदा, 1872 साठी, 'भारतीय पुरावा कायदा' बदलला जाईल.' लोकसभेत बोलताना गृहमंत्री म्हणाले की, 'या तीन कायद्यांच्या जागी जे तीन नवीन कायदे बनवले जातील, त्याचा आत्मा भारतीयांना हक्क मिळवून देणारा असेल. या कायद्यांचा उद्देश कोणालाही शिक्षा करणे हा असणार नाही. जनतेला न्याय मिळवून देणे हा त्याचा उद्देश असेल. अमित शाह म्हणाले की, 18 राज्ये, सहा केंद्रशासित प्रदेश, भारताचे सर्वोच्च न्यायालय, 22 उच्च न्यायालये, न्यायिक संस्था, 142 खासदार आणि 270 आमदारांव्यतिरिक्त जनतेनेही या विधेयकांबाबत सूचना दिल्या आहेत.

चार वर्षांपासून यावर बरीच चर्चा सुरू आहे. यावर आम्ही 158 बैठका घेतल्या आहेत. दाऊद इब्राहिम अनेक दिवसांपासून फरार होता. आता आम्ही ठरवले आहे की सत्र न्यायालयाचे न्यायाधीश खटला चालवू शकतात आणि कोणत्याही व्यक्तीच्या अनुपस्थितीत, तो जगात कुठेही असला तरीही निकाल देऊ शकतात. त्याला शिक्षा टाळायची असेल तर भारतात येऊन खटला लढवा. केंद्र सरकारने IPC, फौजदारी प्रक्रिया संहिता आणि भारतीय पुरावा कायदा 1872 मध्ये सुधारणा करण्यासाठी फौजदारी कायदा दुरुस्ती समिती स्थापन केली.

या समितीचे प्रमुख होते डॉ. रणबीर सिंग, दिल्लीस्थित नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीचे तत्कालीन कुलगुरू समितीच्या इतर सदस्यांमध्ये राष्ट्रीय कायदा विद्यापीठ दिल्लीचे तत्कालीन कुलसचिव डॉ. जी.एस. बाजपेयी, डॉ. बलराज चौहान, डीएनएलयूचे कुलगुरू आणि ज्येष्ठ वकील महेश जेठमलानी आणि दिल्ली जिल्हा व सत्र न्यायालयाचे माजी न्यायाधीश जी.पी. थरेजा यांचा समावेश होता.



### देशद्रोह कायदा रद्द केला जाईल

» आता या तीन नवीन कायद्यांमुळे देशाच्या फौजदारी न्याय व्यवस्थेत मोठा बदल होणार आहे. या विधेयकांतर्गत, आम्ही दोषी ठरविण्याचा दर 90 टक्क्यांहून अधिक वाढवण्याचे लक्ष्य ठेवले आहे. लिंचिंग प्रकरणाशी संबंधित नवीन विधेयकात नवीन तरतुदी करण्यात आल्या आहेत. अल्पवयीन मुलीवरील बलात्कारासारख्या प्रकरणांमध्ये फाशीच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. यासोबतच सरकारी कर्मचाऱ्यावर ठराविक मर्यादेत खटला चालवण्यास मान्यता देण्यात येणार आहे.

# सुष्मिताची मुलीने गायला महामृत्युंजय

ताली या वेबसिरीजच्या ट्रेलरला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. त्यानंतर सुष्मिता सेनने तिची मुलगी रेने सेनसाठी एक इमोशनल नोट लिहून सोशल मीडियावर शेअर केली. या पोस्टद्वारे सुष्मिताने सांगितले की, तिची मुलगी रेनेने तिच्या आगामी वेब सीरिज तालीमध्ये महामृत्युंजय मंत्र गायला आहे. ट्रेलरमध्येही त्याचा वापर करण्यात आला आहे. ही वेब सिरीज 15 ऑगस्टला जिओ सिनेमावर प्रदर्शित होणार आहे. सुष्मिताने लिहिले- माझी मुलगी रेने सेनने या शक्तिशाली महामृत्युंजय मंत्राला तिचा आवाज दिला आहे. या ट्रेलरमध्ये तिचा आवाज आणि माझा चेहरा एकत्र दिसत आहे. प्रत्येक वेळी मी ते ऐकते तेव्हा मला अंगावर शहारे येतात. धन्यवाद शोना! तुला याचा एक भाग व्हायचेच होते आणि ते तू झालीस. 'ताली'च्या ट्रेलरवर प्रेमाचा वर्षाव केल्याबद्दल तुम्हा सर्वांचे मनःपूर्वक आभार! तसेच माझ्यावर इतका विश्वास ठेवल्याबद्दल श्री गौरी सावंत आणि ट्रान्सजेंडर समुदायाचे आभार, अशेही सुष्मिताने लिहिले. सुष्मिता सेनने वयाच्या 24 व्या वर्षी रेनेला दत्तक घेतले होते. नंतर सुष्मिताने अलीशालाही दत्तक घेतले. रेनेने 2021 मध्ये 'सुट्टाबाजी' या चित्रपटातून अभिनय क्षेत्रात पदार्पण केले. रेने ही गायिकाही आहे. रवी जाधव 'ताली' या वेबसिरीजचे दिग्दर्शक आहेत. तालीची कथा क्षितिज पटवर्धन आणि आफिफा नाडियादवाला यांनी लिहिली आहे.



# लाईट बॉय होता अक्षय


अक्षय कुमार अभिनेता होण्यापूर्वी लाईट बॉय म्हणून काम करायचा. तो सेलिब्रिटी फोटोग्राफर्ससोबत अभिनेत्यांचे फोटो क्लिक करायचा. तोपर्यंत त्याच्या मनात अभिनेता होण्यासारखे काही नव्हते. एक दिवस तो गोविंदाला भेटला. अक्षय गोविंदाला त्याचे फोटो दाखवत होता. तेव्हा गोविंदाने अक्षयला पाहिले आणि म्हणाला तू हिरो का बनत नाहीस? गोविंदाचे हे बोलणे अक्षयला मजेशीर वाटले. एका शोमध्ये अक्षयने हा खुलासा केला होता. त्यावेळी गोविंदाही तिथे उपस्थित होता. याचा एक व्हिडिओही सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हायरल व्हिडिओमध्ये अक्षय म्हणतो- फार कमी लोकांना माहिती असेल की माझ्या करिअरमध्ये दादाची (गोविंदा) भूमिका मोठी आहे. अभिनेता होण्यापूर्वी मी सेलिब्रिटी फोटोग्राफरसोबत लाइट बॉय म्हणून काम करायचो.मी लाईट बॉय म्हणून अनेक अभिनेत्यांचे अनेक फोटो क्लिक केले आहेत. तसाच मी गोविंदाचा फोटो क्लिक करत होतो. मला आठवतंय तो त्यांचे फोटो पाहत होता.

# रजनीचा पिक्चर म्हणजे विषयचं हार्ड!



साउथ मेगास्टार रजनीकांत यांचा 'जेलर' हा चित्रपट गुरुवारी म्हणजेच 10 ऑगस्टला प्रदर्शित झाला आहे. जेलर चित्रपटाद्वारे रजनीकांतने तब्बल दोन वर्षांनी मोठ्यापडद्यावर धडाकेबाज पुनरागमन केलं आहे. त्याची क्रेझ फक्त साऊथ पुरताच मर्यादित नसून देशविदेशात त्याच्या चाहत्यांची संख्या आहे. दक्षिणेतील अनेक कार्यालयांमध्ये'जेलर' पाहण्यासाठी अधिकृत सुट्टी देण्यात आली आहे यावरुन चित्रपटाची क्रेझ किती आहे याचा अंदाज लावला जाऊ शकतो. रजनीकांत चा चित्रपट रिलिज होताच चाहत्यामध्ये वेगळाच उत्साह दिसतो. त्याचे चाहते चित्रपटगृहाबाहेर त्याच्या फोटोंवर दुग्धाभिषेक करताय तर काही चाहते थिएटरच्या आतच नाचतांना दिसताय. चित्रपट पाहण्यासाठी एक जोडपं चक्क जपानवरुन आलं होतं. रजनीची जादू प्रेक्षकांवर चालली आहे. जेलर रिलिजची वाट प्रेक्षक पाहत होते आता या चित्रपटाला रिलिज होऊन एक दिवस झाला आहे.

# मुंबई विमानतळावर दिसली उर्वशी रौतेला



गुरुवारी मुंबई विमानतळावर तारकांचा मेळा पाहायला मिळाला. मलायका अरोरा, कंगना रनोट, विद्युत जामवाल आणि उर्वशी रौतेला सारखे सेलिब्रिटी विमानतळावर दिसले. यादरम्यान उर्वशीनेही बार्बीचा ट्रेंड फॉलो केला. अभिनेत्री गुलाबी शर्ट आणि काळ्या पँटमध्ये दिसली होती, ज्यामध्ये ती खूपच ग्लॅमरस दिसत होती. 49 वर्षीय मलायका अरोरा नेहमीच तिच्या लूकसाठी चर्चेत असते. विमानतळावर ती ब्लॅक लूकमध्ये दिसली. तिने ब्लॅक टॉप आणि ब्लॅक पँटसोबत ओव्हर साइज ब्लॅक कोट कॅरी केला आहे. काळ्या हँडबॅग आणि गोल्डन नेकपीससह तिने हा लूक स्टाइल केला आहे. तिने यासोबत काळा गॉगल घातला आहे, ज्यामध्ये ती खूपच स्टायलिश दिसत आहे. बॉलिवूडची क्वीन कंगना रनोटही विमानतळावर दिसली. कंगना अनेकदा कॉटन सलवार सूट किंवा साडीमध्ये विमानतळावर दिसते. यावेळीही ती फिकट गुलाबी आणि जांभळ्या रंगाच्या साडीत दिसली. तिने मॅचिंग ब्लाउजसह ते स्टाइल केले. ॲक्सेसरीज म्हणून कंगनाने तिच्या गळ्यात मोत्याचा हार घातला आणि सनग्लासेस लावला. यादरम्यान कंगनाचा स्वॅग पाहण्यासारखा होता. जाण्यापूर्वी तिने विमानतळावर हसत हसत पापाराझींना पोजही दिली. कंगना सध्या तिच्या आगामी 'इमर्जन्सी' चित्रपटामुळे चर्चेत आहे. यामध्ये अभिनेत्री माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची भूमिका साकारताना दिसणार आहे. याशिवाय या चित्रपटाचे दिग्दर्शनही ती स्वत: करत आहे. हा चित्रपट यावर्षी 24 नोव्हेंबरला रिलीज होणार आहे. विद्युत जामवालची शैली खूपच वेगळी आहे.

# गदर 2 रिव्हिव्ह : सनी हे काय केलसं रे भावा !

गदर पासून सनीला पाकिस्तानचा जावई असं लाडानं म्हटलं जाऊ लागलं. त्यानं पहिल्या भागामध्ये ज्याप्रकारे परफॉर्मन्स दिला होता त्या तुलनेत दुसऱ्या भागात तारासिंग कमी पडल्याचे दिसून येते. त्याच्या चेहऱ्यावर नाही म्हटलं तरी थकलेपणाची झाक आहे. अजूनही त्याच्या मनात काही गोष्टींबाबत राग आहेच पण तो पहिल्या तारा सिंगपेक्षा वेगळाच आहे. त्याचा मुलगा चरणजीत सिंग, पत्नी सकीना अन् तारा अशा या कुटूंबात पुन्हा मोठं वादळ आलं आहे. गदर २ मध्ये सनीकडून प्रेक्षकांनी जरा जास्तच अपेक्षा केली हे मात्र खरे आहे. यावेळी देखील त्याला भलताच राग आला आहे. त्याच्या मुलाला पाकिस्तानी सैन्यानं पकडून ठेवले आहे. त्याच्यावर भलते सलते आरोपही केले आहेत. त्यामुळे त्याला सगळ्या पाकिस्तानी लोकांसमोर फाशी देण्यात येणार आहे. तारा सिंगला जेव्हा कळते की, जीत आपल्याला शोधायला पाकिस्तानात गेला आहे तेव्हा तो सकीनावर चांगलाच संतापतो. किमान तुला तरी कळायला हवे होते. असे म्हणून तिच्यावर तो आगपाखड करतो. वास्तविक जीतला वाटते त्यादिवशी



रामटेकडीवर ट्रक घेऊन गेलेल्या आपल्या वडिलांना पाकिस्तानी सैन्यांनी बंदी म्हणून नेले आहे. आणि ते पुन्हा येणं खूपच कठीण आहे. त्यांना काही करुन सोडविण्यासाठी तो बैचेन होतो. पाकिस्तानात जातो. तिथं तो जे काही करतो त्यासाठी बापाला म्हणजे तारा सिंगला मोठी किंमत चुकवावी लागते. तारा सिंग पाकिस्तानात जाण्याची तयारी सुरु करतो. त्याला काय माहिती मुलानं तिकडं काय पराक्रम करुन ठेवला आहे ते...जीत पाकिस्तानात मुस्कानच्या प्रेमात पडतो. मुस्कान तर त्याच्यासोबत लग्न करण्याचा विचार करु लागते. शेवटी पाकिस्तानच्या आर्मीला जित कोण आहे आणि तो कशासाठी पाकिस्तानात आला आहे याविषयी कळते ते त्याला अटक करतात. यासगळ्यात तारा सिंगची मुलाला सोडविण्यासाठीची धडपड, त्यासाठी त्यानं केलेला संघर्ष हे पुन्हा एकदा जाणून घ्यायचे असल्यास गदर २ पाहायला जा.. सनी वगळता कुणाची ॲक्टिंगही तितकीशी प्रभावी नाही. अमिषा फारच अशक्त वाटू लागते. तिच्या वाट्याला तसंही फारसं काम नाही. पण सनी अन् अमिषामधील फ्लॅशबॅक बऱ्याचदा चित्रपटात येतात आणि त्रस्त करु लागतात. मागच्या चित्रपटात अमूक वेळी काय घडले होते आणि आता काय होते हे दाखवण्याचा प्रयत्न दिग्दर्शकानं या निमित्तानं केला आहे पण तो सारखा सारखा केल्यानं तापदायक वाटू लागतो.

# रोहित-विराट शिवाय कसे होणार?

## » दोन्ही दिग्गजांशिवाय खेळण्यास किती तयार आहे टीम इंडिया ?

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**टीम इंडिया विंडिजमध्ये रोहित शर्मा आणि विराट कोहलीशिवाय एकदिवसीय आणि टी-20 सामने खेळत आहे. त्यात 5 पैकी 3 सामने गमावले संघाने गमावले आहेत. यामध्ये 2 टी-20 आणि एका वनडेचा समावेश होता. संघ व्यवस्थापनाने म्हटले की, ते प्रयोग करत आहेत यामुळे अनेक युवा खेळाडूंना संधी मिळेल.**

मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविडनेही प्रयोगाच्या रणनीतीचा बचाव केला. पण पण टीम इंडिया खरंच 36 वर्षीय रोहित आणि 34 वर्षीय विराटशिवाय खेळण्यास सज्ज आहे का? या प्रश्नाचे उत्तर जाणून घेऊ. भारताने 2006 मध्ये आंतरराष्ट्रीय टी-20 खेळण्यास सुरुवात केली. रोहित शर्माने सप्टेंबर 2007 मध्ये आणि विराटने 2010 मध्ये T20 मध्ये पदार्पण केले. भारताने आतापर्यंत 202 टी-20 सामने खेळले आहेत, त्यापैकी 198 या दोघांच्या पदार्पणानंतरचे होते. त्यात 167 वेळा रोहित किंवा विराट पैकी एकजण प्लेइंग-11 चा भाग होता. यातील 109 सामने भारताने जिंकले. म्हणजे विजयाची टक्केवारी 65.27% होती.

यामध्ये त्या सामन्यांचाही समावेश आहे जेव्हा दोघेही प्लेइंग-11 मध्ये एकत्र होते. 2007 पासून आतापर्यंत टीम इंडियाने या दोघांना प्लेइंग इलेव्हनमध्ये एकत्र ठेवून 96 टी-20 सामने खेळले आहेत. त्यापैकी 63 जिंकले आणि 30 मध्ये पराभूत झाला. म्हणजे विजयाची



टक्केवारी सुमारे 65% होती. दोन्ही आणि एक खेळाडू असल्यास भारत जवळपास सारखेच T20 सामने जिंकतो. 2012 पासून, भारताने या दोन खेळाडूंना एकत्र ठेवून बहुतेक सामने खेळण्यास प्राधान्य दिले. टीम इंडियाने 2007 पासून रोहित आणि विराटशिवाय 31 टी-20 सामने खेळले आहेत. त्यापैकी 18 मध्ये संघ जिंकला आणि 11 मध्ये पराभूत झाला. एक सामना बरोबरीत तर एक अनिर्णितही राहिला. संघाची विजयाची टक्केवारी जवळपास 58% पर्यंत पोहोचली, ती एक किंवा दोघे खेळताना असलेल्या टक्केवारीपेक्षा 7% कमी होती.

एवढेच नाही तर 2011 ते 2018 पर्यंत संघाने त्यांच्याशिवाय फक्त 6 टी-20 सामने खेळले. त्यापैकी 5 सामने झिम्बाब्वे विरुद्ध आणि एक अफगाणिस्तान विरुद्ध होता, त्यात 2 मध्ये संघाला पराभवाला सामोरे जावे लागले होते.

म्हणजेच टीम इंडियाने 2011 ते 2018 या काळात दोन्ही खेळाडूंशिवाय टी-20 खेळले नाही. विराट कोहलीने 20 जून 2011 रोजी पदार्पण केले, तर रोहित शर्मीने नोव्हेंबर 2013 मध्ये कसोटी पदार्पण केले. पदार्पण केल्यापासून, भारताने 124 कसोटी सामने खेळले आहेत, त्यापैकी दोन खेळाडूंपैकी एकतरी 113 सामन्यांमध्ये प्लेइंग-11 चा भाग होता. त्यापैकी टीम इंडिया 59 मध्ये जिंकली, 32 मध्ये पराभूत झाली आणि 22 सामने अनिर्णित राहिले. म्हणजेच, संघ फक्त 28% सामने हरला. 113 पैकी विराट कोहली 111 कसोटीत प्लेइंग-11 चा भाग होता.

### दोघांशिवाय फक्त 11 कसोटी

» जून 2011 पासून भारताने रोहित आणि विराटशिवाय केवळ 11 कसोटी सामने खेळले. 5 मध्ये संघ जिंकला आणि 5 मध्येच हरला, तर एक कसोटीही अनिर्णित राहिली. संघाची विजयी टक्केवारी 45% च्या जवळ होती. ती एक किंवा दोघे खेळताना असलेल्या तुलनेत कमी होती. या काळात संघाने जवळपास 45% सामने गमावले 2018 पर्यंत या दोघांशिवाय भारत फक्त 8 कसोटी खेळला. त्यात 2011 मध्ये इंग्लंड विरुद्ध 4 आणि वेस्ट इंडिज विरुद्ध 2 कसोटी सामील आहेत. इंग्लंडमध्ये संघाने सर्व सामने गमावले, तर वेस्ट इंडिजमध्ये त्यांनी सर्व सामने जिंकले. या संघाने भारतात ऑस्ट्रेलिया आणि अफगाणिस्तानविरुद्ध प्रत्येकी एक कसोटीही खेळली होती, या दोन्ही कसोटी संघाने जिंकल्या होत्या.

# पृथ्वी शॉने रचला इतिहास !

## » स्पर्धेच्या इतिहासातील सर्वोच्च धावसंख्या

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**भारताचा फलंदाज पृथ्वी शॉ याने बुधवारी नॉर्थहॅम्प्टन काउंटी ग्राउंडवर सॉमरसेटविरुद्ध वन-डे कप स्पर्धेत नॉर्थहॅम्प्टनशायरसाठी द्विशतक ठोकले. शॉने 81 चेंडूत शतक पूर्ण केले आणि नंतर 153 चेंडूत 244 धावांची खेळी केली. शॉने 28 चौकार आणि 11 षटकार खेचले. शॉने स्पर्धेच्या इतिहासातील सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्येचा विक्रम केला. त्याने ऑली रॉबिन्सनच्या 206 (2022 मध्ये केंटसाठी) मागे टाकले.**

मुंबईच्या या फलंदाजाने लिस्ट ए कारकिर्दीतील दुसरे द्विशतक झळकावले आहे. त्याने 2020-21 विजय हजारे ट्रॉफीमध्ये पुदुचेरीविरुद्ध पहिले द्विशतक झळकावले. शॉने मुंबईसाठी नाबाद 227 धावांची खेळी केली. त्यानंतर तो स्पर्धेतील सर्वाधिक धावा करणारा खेळाडू होता. नॉर्थहॅम्प्टनशायरने वनडे कपमध्ये त्यांची दुसरी सर्वोच्च धावसंख्या नोंदवली. संघाने आठ गड्यांच्या मोबदल्यात 415 धावा केल्या. शॉने नवव्या शतकासह अनेक लिस्ट ए रेकॉर्ड तोडले. गेल्या आठवड्यात ग्लॉस्टरशायरविरुद्ध नॉर्थहॅम्प्टनशायर पदार्पणात शॉ 34 धावांवर हिट-विकेट बाद झाला होता. पृथ्वी शॉ 50 षटकांच्या सामन्यात म्हणजेच लिस्ट ए सामन्यांमध्ये सर्वाधिक धावा करणारा सहावा फलंदाज ठरला आहे. या यादीत पहिले नाव तामिळनाडूच्या नारायण जगदीशनचे आहे, त्याने विजय हजारे ट्रॉफीमध्ये अरुणाचल प्रदेशविरुद्ध 277



धावांची खेळी केली होती. 2018 मध्ये कर्णधार म्हणून भारताला अंडर-19 विश्वचषक जिंकून देणाऱ्या पृथ्वी शॉने 2018 मध्येच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. पदार्पणाच्या कसोटीतच त्याने शतक झळकावले, पण आंतरराष्ट्रीय स्तरावर त्याचे तंत्र गोलंदाजांसमोर कमकुवत दिसत होते. त्याने शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना जुलै 2021 मध्ये श्रीलंकेविरुद्ध वनडे म्हणून खेळला आणि तेव्हापासून तो भारतासाठी एकही सामना खेळू शकला नाही. या वर्षी न्यूझीलंडविरुद्धच्या टी-20 मालिकेसाठी शॉचा संघात समावेश करण्यात आला होता, परंतु शुभमन गिल आणि ऋतुराज गायकवाड यांच्या उपस्थितीत त्याला प्लेइंग-11 मध्ये स्थान देण्यात आले नाही. आता टी-20 टीम वेस्ट इंडिज दौऱ्यावर आहे, अशा परिस्थितीत आयपीएलच्या खराब हंगामानंतर त्याला टीम इंडियामध्ये संधी मिळते का हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

### इंग्लंडमध्ये खेळत आहेत चार भारतीय

» या मोसमात इंग्लंडमध्ये क्लब क्रिकेट खेळणारा पृथ्वी शॉ हा पाचवा भारतीय खेळाडू आहे. त्याच्या आधी चेतेश्वर पुजारा (ससेक्स), अजिंक्य रहाणे (लीसेस्टरशायर), अर्शदीप सिंग (केंट) आणि नवदीप सैनी (वोस्टरशायर) हे देखील इंग्लंडच्या देशांतर्गत क्रिकेटचा भाग राहिले आहेत. मात्र, अर्शदीप, सैनी आणि रहाणे यांनी नावे मागे घेतली आहेत. पुजारा वन डे कपमध्ये ससेक्स संघाकडून खेळत आहे.

# विश्वचषकाचे नवे वेळापत्रक

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (ICC) वनडे विश्वचषक 2023 चे नवीन वेळापत्रक जाहीर केले आहे. सुधारित वेळापत्रकात 9 सामन्यांच्या तारखा बदलण्यात आल्या आहेत. भारत-पाकिस्तान सामना आता अहमदाबादमध्ये 15 ऑक्टोबर ऐवजी 14 ऑक्टोबरला होणार आहे. त्याचवेळी 12 नोव्हेंबर रोजी कोलकाता येथे होणारा पाकिस्तान-इंग्लंड सामना आता 11 नोव्हेंबर रोजी होणार आहे. टीम इंडियाला 11 नोव्हेंबरला नेदरलँड्सविरुद्ध ग्रुप स्टेजमध्ये शेवटचा सामना खेळायचा होता, पण आता हा सामना 12 नोव्हेंबरला बेंगळुरूमध्ये होणार आहे. विश्वचषकात 9 सामन्यांचे वेळापत्रक बदलण्यात आले आहे, पण कोणत्याही सामन्याचे ठिकाण बदललेले नाही. भारत-पाकिस्तान सामन्याचे वेळापत्रक बदलल्याने इंग्लंड-बांगलादेश आणि श्रीलंका-पाकिस्तान सामनेही रद्द करावे लागले. आता 10 ऑक्टोबरला इंग्लंड-बांगलादेश आणि पाकिस्तान-श्रीलंका यांच्यात सामना होणार आहे. ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील मोठा सामना लखनऊमध्ये 13 ऑक्टोबरऐवजी 12 ऑक्टोबरला होणार आहे. सुधारित वेळापत्रकात पाकिस्तानसह बांगलादेश आणि इंग्लंडच्या 3-3 सामन्यांच्या तारखाही बदलण्यात आल्या आहेत. ऑस्ट्रेलिया आणि भारताच्या प्रत्येकी दोन सामन्यांचे वेळापत्रक बदलण्यात आले आहे, तर न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका, श्रीलंका आणि नेदरलँड यांच्याही प्रत्येकी एका सामन्याते पुन्हा नियोजने करावे लागले आहे. 15 ऑक्टोबरपासून हिंदू सण नवरात्रीलाही सुरू होत असल्याने भारत-पाकिस्तान यांच्यातील सामन्यासाठी सुरक्षा पुरवण्यात अडचणी येऊ शकतात, असे अहमदाबाद पोलिसांनी सांगितले. त्यानंतर सामन्याचे वेळापत्रक बदलण्याचा मुद्दा दोन आठवड्यांपूर्वी सुरू झाला.